# भारतीय सैन्याकडून 'ऑपरेशन सिंदूर' फत्ते


शेतकऱ्यांपर्यंत शासनाच्या योजना प्रभावीपणे पोहोचवा : ॲड. निलेश हेलोंडे >> पान 2

राज्यात १६ ठिकाणी मॉक ड्रिलचे प्रात्यक्षिक >> पान 3

कृषी सहाय्यकांच्या समस्यांचा शासन स्तरावर पाठपुरावा करणार-शिवसेना आ. सिध्दार्थ खरात >> पान 4


**सुविचार**
जीवनात प्रेम आणि आपुलकी वाढवा.


दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 263 ■ गुरुवार, दि. 08 मे 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





सितारे जमीन पर ने आमिर खानने पहिल्यांदाच चित्रपटाचा सिक्केल आणला

आतील पान


# भारताचं पाकिस्तानवर एअर स्ट्राईक

## भारतीय सैन्यानं पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला, ९ दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त

**नवी दिल्ली : भारतीय सैन्य दलानं जम्मू काश्मीर मधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला आहे. भारतीय सैन्यदलानं पाकव्याप्त काश्मीरमधील मुजफ्फराबादमध्ये ९ ठिकाणांवर स्ट्राइक केला आहे. संरक्षण मंत्रालयाकडून जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार भारतीय सैन्यदलांनी पाकिस्तान आणि पाकिस्तानच्या ताब्यातील पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यांच्या मुलभूत ठिकाणांवर हल्ले करत ऑपरेशन सिंदूर सुरु केलं. ज्या ठिकाणावरुन भारताविरोधात दहशतवादी हल्ला करण्याची योजना तयार करण्यात आली त्या ९ ठिकाणांवर हल्ले करण्यात आले.**



संरक्षण मंत्रालयानं म्हटलं की आमची कारवाई केंद्रीत,स्पष्ट आणि कोणताही वाद निर्माण करण्यापासून वाचलेली आहे. आम्ही कोणत्याही पाकिस्तानी सैन्य ठिकाणांवर हल्ला केलेला नाही. भारतानं ठिकाणांची निवड करण्यात आणि ते उद्धवस्त करण्यात खूप संयम दाखवला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात भारतीय २५ आणि एका नेपाळी नागरिकांची हत्या करण्यात आली होती. संरक्षण मंत्रालयाच्या वक्तव्यानुसार आम्ही आमची कटिबद्धता निश्र्चित केली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यास जबाबदार असलेल्यांना उत्तर दिलं जाईळ. ऑपरेशन सिंदूर संदर्भातील माहिती नंतर देऊ, असंही संरक्षण मंत्रालयानं म्हटलं.

जम्मू काश्मीरमध्ये अनंतनाग जिल्ह्यात २२ एप्रिलला पहलगाम येथे पर्यटकांवर भ्याड हल्ला झाला होता. या हल्ल्यात लष्कर-ए-तोयबाच्या द रेजिस्टंस फ्रंटचा हात होता, त्यांनी जबाबदारी स्वीकारली होती. त्या घटनेनंतर पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआयच्या दबावामुळं त्यांनी जबाबदारी झटकली होती. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांची अमानूष हत्या करण्यात आली होती. पहलगाम हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी जम्मू काश्मीरमध्ये दहशतवाद्यांविरुद्ध कठोर पावलं उचलली आहेत. जम्मू काश्मीरमध्ये ४८ पर्यटन स्थळं बंद करण्याचा निर्णय स्थानिक राज्य सरकारनं घेतला आहे.

भारतानं पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सिंधू जलकरार स्थगित केला आहे. पाकिस्तानचे सर्व प्रकारचे व्हिसा रद्द केलेत. याशिवाय भारतानं पाकिस्तानी दूतावासातील कर्मचारी संख्या देखील कमी केलीय.

दरम्यान, भारतीय सैन्य दलांनी केलेल्या कारवाईचं विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी स्वागत केलं आहे. यामध्ये आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, पीयूष गोयल यांचा समावेश आहे. अचूक लक्ष्य साधलं. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सेनेनं बहावलपूरमध्ये जैश ए मोहम्मदचं हेडक्वार्टर उद्धस्त केलं.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला म्हणून, भारताच्या लष्कर, नौदल आणि हवाई दलाने संयुक्तपणे पाकिस्तानमधील दहशतवादी छावण्यांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. भारताने आपल्या हद्दीत राहून हा हवाई हल्ला केल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. तथापि, हा हवाई हल्ला पाकिस्तानच्या सुमारे १०० किमी आत करण्यात आला. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः ापरेशन मॉनिटर करत होते. ९ टार्गेट ठेवण्यात आले होते. ९ च्या ९ टार्गेट यशस्वी झाले आहेत.

## पंतप्रधान मोदी स्वत: मॉनिटर करत होते 'ऑपरेशन सिंदूर'



नवी दिल्ली : भारतीय सेनेनं अखेर पाकिस्तान आणि पोकव्याप्त काश्मिरमधील अतिरेक्यांचे नऊ कॅम्प्स उद्धस्त करून ऑपरेशन सिंदूर ही मोहीम फत्ते केली. भारतीय हवाई दलानं आज (७ मे) मध्यरात्री दीडच्या सुमारास अतिरेक्यांच्या नऊ ठिकाणांवर यशस्वी एअर स्ट्राईक करून पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला. भारतीय सेनेच्या या खास मोहिमेला ऑपरेशन सिंदूर असं नाव देण्यात आलं होतं.

भारतीय वायुदलाकडून जैश ए मोहम्मद, हिजबुल मुज्जाहिद्दीन, लश्कर ए तोयबाचे तळ उद्धवस्त, मध्यरात्री दीड वाजता कारवाई, दहशतवाद्यांचे ट्रेनिंग सेंटरही उद्धस्त करण्यात आले. उल्लेखनीय बाब म्हणजे या मोहिमेत भारतीय सेनेनं पाकिस्तानी नागरिक किंवा पाकिस्तानी लष्कराच्या कोणत्याही ठिकाणांवर हल्ला केला नाही. भारतीय सेनेनं या मोहिमेत बहावलपूर, कोटली आणि मुझफ्फराबाद या तीन शहरांमधल्या केवळ अतिरेक्यांच्या कॅम्पसचं म्हणून त्यावर उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे. भारताने दहशतवाद संपवण्यासाठी प्रतिसाद दिला आहे. दहशतवादी जम्मू आणि काश्मीरमधील विकास थांबवू इच्छितात. टीआरएफ ही लष्करशी जोडलेली संघटना आहे. पहलगाम हल्ल्यात टीआरएफचा सहभाग आहे, अशी माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दिली आहे.

लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांनी या मोहिमेबाबत माहिती देताना सांगितलं की, भारतीय लष्कराच्या अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या की, २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना न्याय >> पान २

# पाणीटंचाईवर प्रभावी उपाय असलेला जलतारा प्रकल्प राबविण्याची गरज

## प्रशासनाने पुढाकार घेण्याची स्थानिक नागरिकांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा : कधी अतिवृष्टी तर, कधी पाणीटंचाई अशा नैसर्गिक संकटाने शेतकरी हतबल झाला आहे. पावसाळ्याच्या दिवसात शेत चिभडल्याने नापिकी तर उन्हाळ्याच्या दिवसात पाणीटंचाईने वर्षानुवर्षापासून सुरू असलेली पाण्यासाठी ची भटकंती कायमस्वरूपी बंद व्हावी, शेतकरी सुखी व समृद्ध व्हावा, यासाठी जालना जिल्ह्यातील ध्येयवेड्या डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी जलतारा हा अभिनव प्रकल्प राबवून शेतीत खऱ्या अर्थाने समृद्धी आणली आहे.जलतारा प्रकल्पातून जमिनीच्या भूगर्भात पाणी मोठ्या प्रमाणात मुरले जात असल्याने परिसर पाणीदार झाला आहे.तर, चिभड्या जमिनी सुद्धा सुपिक झाल्याने शेतकरी वर्ग ही समृद्ध झाला आहे. जिल्ह्यातील प्रत्येक गावागावात हा प्रकल्प राबविण्यासाठी शासन प्रशासनाने पुढाकार घेऊन हा प्रकल्प जिल्ह्यात राबवावा, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे.**

बुलढाणा जिल्ह्यात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून अर्धा अधिक भाग पाणीटंचाईने होरपळला जात आहे.पाणीटंचाईच्या सर्वाधिक झळा घाटावरील मेहकर,बुलढाणा, देऊळगाव राजा, चिखली, सिंदखेडराजा, लोणार या तालुक्यांना सहन कराव्या लागत आहेत. मेहकर तालुका तर पाणीटंचाईच्या बाबतीत डेंजर झोन मध्ये गेला आहे. जिल्ह्यात सद्यस्थितीत १,३३४ गावापैकी १६८ उपाययोजनांना मंजुरी मिळाली. विंधन विहिरी, कुपनलिका घेणे, नळ योजनांची विशेष दुरुस्ती, विंधन विहिरींची विशेष दुरुस्ती, तात्पुरत्या पूरक नळ योजना, टँकरने पाणीपुरवठा, खासगी विहीर अधिग्रहण, बुडक्या घेणे, विहिरी खोलीकरण, गाळ काढणे, प्रगतिपथावरील पाणीपुरवठा योजना पूर्ण करणे अशी कामे केली जात आहेत. येत्या काळात १,१४५ गावांमध्ये टंचाई परिस्थिती उद्भवण्याची शक्यता लक्षात घेता उपायांची तयारी सुरू असल्याची माहिती आहे. मेहकर तालुक्यामध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना रानोमाळ भटकंती करण्याची वेळ आली आहे. मेहकर तालुक्यात पार्डी, जवळा, हिवरा साबळे, वरवंड, बोथा, उटी, पाथर्डी; बुलढाणा तालुक्यातील पिंपळगाव सराई, सैलानी, ढासाळवाडी, पिंपरखेड, देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा, निमखेड, कुंभारी, सावखेड नागरे; चिखली तालुक्यातील भालगाव, श्रीकृष्णनगर, कोलारा आणि सिंदखेड राजा तालुक्यातील सावरगाव माळ व पांग्री उगले या गावांमध्ये टँकरद्वारे नागरिकांची तहान भागविली जात आहे. शासन दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून पाणी पुरवठा केला जात आहे, असे असतानाही पाणीटंचाईसाठी नागरिकांची रानोमाळ भटकंती वर्षानुवर्षापासून कायम आहे. या पाणीटंचाईवर प्रभावी उपाय व शेती सुपीक करण्यासाठी अत्यंत प्रभावी उपाय ठरलेल्या जलतरा प्रकल्प पाणीटंचाईग्रस्त गावात व संपूर्ण जिल्ह्यात राबवण्याची गरज निर्माण झाली आहे. यासाठी मायबाप शासन व प्रशासनाने जातीने पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे. एका शोष खड्ड्यामध्ये एका वर्षात तीन लाख ६० हजार लीटर पाणी जमिनीच्या भूगर्भामध्ये मुरले जात असल्याने पाणी पातळीत प्रचंड प्रमाणात वाढ होते. त्याचबरोबर जमिनीची सुपिकता ही वाढली आहे. विशेष म्हणजे कोणतेही खर्चिक बाब न करता.परिसर पाणीदार करण्याची किमया या




### जलतारा भाग २

ध्येयवेड्या डॉ. पुरुषोत्तम वायाळ या जलतज्ञांनी केली आहे. जलतारा हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी अत्यंत कमी खर्चाचा आणि फायद्याचा ठरला आहे. त्यामुळे अवघ्या काही वर्षातच जलतरा प्रकल्प हा संपूर्ण महाराष्ट्रात शासन स्तरावर राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.जलतारा प्रकल्पामुळे पाणीटंचाईत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. तर, जमिनीतील पाणी पातळी प्रचंड प्रमाणात वाढली आहे.जमिनीची सुपिकता वाढली. त्यामुळे जलतरा हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी समृद्धीचा मार्ग ठरला आहे. जिल्ह्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी व शेतीची सुपीकता वाढवण्यासाठी जलतारा हा प्रकल्प पाणीटंचाईग्रस्त गावाबरोबर संपूर्ण जिल्ह्यात राबवावा यासाठी शासन प्रशासनाने पुढाकार घ्यावा,अशी अपेक्षा जिल्ह्यातील नागरिकांकडून होत आहे.




देविदास खनपटे
मुख्य संपादक

## भारताचे चोख प्रत्युत्तर


२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवादी हल्लयात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला या भ्याड हल्लयानंतर संपूर्ण भारतात संतापाची लाट उसळली. दहशतवाद्यांनी केलेला हा भ्याड हल्ला पर्यटकांवर नव्हता तर भारताच्या सार्वभौमत्वावर होता त्यामुळे भारत पाकिस्तानच्या या भ्याड हल्लयास कधी चोख प्रतिउत्तर देणार ? असा प्रश्न विचारला जात होता. याचे उत्तर बुधवारी मिळाले. बुधवार ७ मे रोजी मध्यरात्री १ वाजून २८ मिनिटांनी भारतीय वायू दलाने पाकव्याप्त काश्मीरवर हवाई हल्ले केले. भारतीय हवाई दलाने केलेल्या या हल्लयात पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळावर हल्ले करून दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले. भारतीय हवाई दलाने केलेल्या या हल्लयात शेकडो दहशतवादी ठार झाले आहेत. भारताने केलेल्या या हल्लयात किती दहशतवादी ठार झाले याचा आकडा समोर आला नसला तरी या हल्लयात १०० पेक्षा अधिक दहशतवादी ठार झाल्याची शक्यता असून यात लष्कर ए तोयबा आणि जैश ए मोहम्मदचे अनेक मोठे दहशतवादी ठार झाले आहेत. भारतीय हवाई दलाने जवळपास २३ मिनिटे हल्ले केले. भारताने केलेल्या हवाई हल्लयाला ऑपरेशन सिन्दुर असे नाव देण्यात आले. पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्लयात ज्या भारतीय महिलांचे कुंकू ( सिन्दुर ) पुसले गेले त्या महिलांच्या सन्मानार्थ या मोहिमेला लष्कराने ऑपरेशन सिन्दुर असे नाव दिले. ऑपरेशन सिन्दुर यशस्वी करून भारतीय सैन्याने पहलगाम येथे मरण पावलेल्या २६ पर्यटकांच्या हत्येचा बदला घेतला आहे. भारतीय सैन्याची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. पाकिस्तानला जशास तसे उत्तर देणाऱ्या भारतीय सैन्याच्या या गौरवपूर्ण कामगिरीने १५० कोटी भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. भारतीय सैन्याच्या या कामगिरीचा देशवासीयांना सार्थ अभिमान असून १५० कोटी भारतीय भारतीय सैन्यदलापुढे नतमस्तक आहे. जो भारताकडे तिरक्या नजरेने पाहिल त्याला भारत घरात घुसून मारेल असा इशाराच भारताने जगाला दिला आहे. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्यांची गय केली जाणार नाही. क्शनला रीक्शन मिळणारच. हा भारत २०२५ चा भारत आहे हे भारताने पाकिस्तानला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. ही मोहीम यशस्वी करून भारतीय सैन्यदलाने आपले सामर्थ्य जगाला दाखवून दिले आहे. अर्थात भारताने पाकव्याप्त काश्मीरवर केलेला हा पहिला हवाई हल्ला नाही. या आधी २०१६ आणि २०१९ साली भारताने असाच हवाई हल्ला करून पाकिस्तानला इशारा दिला होता. मात्र दोनदा हवाई हल्ले झाल्यानंतर देखील पाकिस्तानची खोड मोडली नाही पाकिस्तानने दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करणे चालूच ठेवले त्याचे परिणाम पाकिस्तानला भोगावे लागले. आता तरी पाकिस्तानने शहाणे व्हावे व दहशतवाद्यांना केली जाणारी लष्करी व आर्थिक मदत थांबवावी नाही तर भारत यापेक्षाही मोठी कारवाई करेल. १९७१ साली भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे केले जर पाकिस्तानने आपली खोड मोडली नाही तर भविष्यात पाकिस्तानचे चार तुकडे होतील. भारताने पाकव्याप्त काश्मीरवर केलेल्या या हवाई हल्लयाला पाकिस्तान कसे उत्तर देईल हे पाहावे लागेल. अर्थात या हवाई हल्लयाला पाकिस्तानने प्रतिउत्तर दिले तर ती पाकिस्तानची सर्वात मोठी चूक ठरेल जर पाकिस्तानने तसे केले तर भारत – पाकिस्तान युद्धाला तोंडच फुटेल. भारत पाकिस्तान युद्धाला तोंड फुटले तर पाकिस्तान जगाच्या नकाशावरून गायब होऊ शकतो याचे भान पाकिस्तानने ठेवावे. पाकिस्तानने चीनच्या भरवश्यावर भारताशी दोन हात करू नयेत कारण आजचा भारत हा चीनलाही जशास तसे उत्तर देण्यास सक्षम आहे. चीननेही पाकिस्तानची बाजू लावून धरू नये कारण दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात भारताला अनेक देशांची साथ आहे. अमेरिका, इस्राईल, जपान, रशिया या देशांनी आताच भारताला पूर्ण पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानला जरी तुर्कस्तान, मलेशिया आणि काही इस्लामिक राष्ट्रांनी पाठिंबा दिला असला तरी जगातील सर्व प्रमुख देश भारतच्या बाजूने आहे हे पाकिस्तानने विसरू नये. पाकिस्तानने जर पुन्हा भारताची कुरापत काढली तर त्याची शिक्षा पाकिस्तानला मिळेलच यात शंका नाही. ऑपरेशन सिन्दुर यशस्वी करणाऱ्या भारताच्या सैन्यदलाला सॅल्युट! जयहिंद !!

### वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष यांनी घेतला विविध विषयाचा आढावा

# शेतकऱ्यांपर्यंत शासनाच्या योजना प्रभावीपणे पोहोचवा : ॲड. निलेश हेलोंडे

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत शेतकऱ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी जिल्ह्यातील सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून कार्य करणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करून त्या थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवाव्यात, अशा सूचना कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयाचा आढावा घेण्यात आला. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार, जिल्हा कृषी अधीक्षक मनोज ढगे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक कौशलेद्र कुमार सिंह यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

सहकार आणि पणन विभागाने सावकारांकडे अडकलेली शेतकऱ्यांची जिल्ह्यामध्ये एकूण ७२.२५ हेक्टर जमीन शेतकऱ्यांना परत मिळवून दिली. सावकारी पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता करणे, आणि आत्महत्येपासून शेतकऱ्यांना परावृत्त करणे यासाठी हे अभियान महत्वपूर्ण असल्याचे यावेळी हेलोंडे पाटील यांनी सांगितले. तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांच्या विकासासाठी आवश्यक असणारी यंत्रसामग्री किंवा जोड व्यवसाय प्रशिक्षण, व्यवसाय, कृषी आधारित प्रक्रिया उद्योग यावर भर द्यावा. पशुपालकांना जनावरांसाठी चारा उपलब्धतेसाही जिल्हा प्रशासन व पशुसंवर्धन विभाग यांनी मिळून नियोजन करावे, असे निर्देश वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे-पाटील यांनी आज आढावा बैठकीत दिले.

बैठकीमध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, शेतकरी आत्महत्या झालेल्या पात्र वारसांना स्वयंरोजगार प्रशिक्षण, वन्य प्राण्यांपासून शेती पिक नुकसान भरपाई, रेशीम लागवड, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, पशुसंवर्धन विभागामार्फत शेतकऱ्यांना दुधाळ जनावरे व शेळी वाटप योजना अशा विविध योजनाचा आढावा घेऊन चर्चा केली. तसेच कृषि विभागाच्या सर्व योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत विशेषत: आत्महत्या केलेल्या कुटूंबाला मिळेल यांची खात्री करावी. जिल्ह्यातील सर्व विभागांनी शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समन्वयाने काम करावे,असे निर्देश ॲड. हेलोंडे पाटील यांनी दिले.

## सितारे जमीन पर ने आमिर खानने पहिल्यांदाच चित्रपटाचा सिक्वेल आणला

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** सितारे जमीन पर या चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित होताच प्रेक्षकांना या बहुप्रतिक्षित चित्रपटाची पहिली झलक मिळाली. यामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता वाढली आहे.या चित्रपटाद्वारे आमिर खान पुन्हा बऱ्याच काळानंतर मोठ्या पडद्यावर परतत आहे. हा आमिर खानच्या कारकिर्दीचा पहिलाच सिक्वेल आहे.

आमिर खानने आतापर्यंत कोणत्याही चित्रपटाचा सिक्वेल केलेला नाही. भारतीय चित्रपटसृष्टीला अनेक ब्लॉकबस्टर चित्रपट देऊनही, तो कधीही कोणत्याही सिक्वेलचा भाग नव्हता, परंतु सितारे जमीन पर हा त्याच्या चित्रपटसृष्टीतील पहिला सिक्वेल असेल.

तारे जमीन पर मध्ये इशान नावाच्या ८ वर्षांच्या मुलाची कथा दाखवण्यात आली होती, जो कलेत अत्यंत हुशार होता पण त्याला डिस्लेक्सियाचा त्रास होता. त्याचे नवीन कला शिक्षक निकुंबा, म्हणजेच आमिर खान, त्याची समस्या समजून घेतात. या चित्रपटाने लोकांच्या हृदयाला स्पर्श केला आणि आजही आमच्या आठवणींमध्ये त्याचे एक विशेष स्थान आहे. याशिवाय, आमिर खान प्रॉडक्शन्स सितारे जमीन पर या चित्रपटाद्वारे १० नवीन चेहरे आणत आहे.

या चित्रपटामध्ये आरुष दत्ता, गोपी कृष्ण वर्मा, संवित देसाई, वेदांत शर्मा, आयुष भन्साळी, आशिष पेंडसे, ऋषी शहानी, ऋषभ जैन, नमन मिश्रा आणि सिमरन मंगेशकर यांचा समावेश आहे. आमिर खान प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली निर्मित, सितारे जमीन परमध्ये आमिर खान आणि जेनेलिया डिसूझा मुख्य भूमिकेत दिसणार आहेत.

चित्रपटातील गाणी अमिताभ भट्टाचार्य यांनी लिहिली आहेत आणि संगीत शंकर-एहसान लॉय यांनी दिले आहे. त्याची पटकथा दिव्या निधी शर्मा यांनी लिहिली आहे. या चित्रपटाची निर्मिती आमिर खान आणि अपर्णा पुरोहित यांनी केली आहे, तर रवी भागचंडका हे देखील निर्माता म्हणून जोडलेले आहेत. आर. एस. प्रसन्ना दिग्दर्शित हा चित्रपट २० जून रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होईल.

## भारताला जशास तसं उत्तर द्या, हल्ल्याचा बदला घ्या... पाकची वल्गना सुरूच, पाकिस्तानच्या पतंप्रधानांचे लष्कराला कारवाईचे सर्वाधिकार

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरचा धसका घेतलेल्या पाकिस्तानमध्ये आता गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याचं चित्र आहे. भारताला जशास तसं उत्तर देण्यासाठी परवानगी मिळावी अशी मागणी तिथल्या लष्कराने पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्याकडे केली. त्यानंतर पाकिस्तानी लष्कराला कारवाईचे सर्वाधिकार देण्यात आले आहेत. या संबंधी पाकिस्तान सरकारकडून अधिकृत निवेदन जारी करण्यात आलं.




भारताच्या प्रत्युत्तराच्या कारवाईमुळे पाकिस्तान हादरला आहे. पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी राष्ट्रीय सुरक्षा बैठक घेतली. त्यानंतर लष्कराला कारवाईचे संपूर्ण अधिकार देण्यात आले आहेत.

भारताने पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला. भारताने पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातल्या दहशतवाद्यांच्या नऊ तळांवर मध्यरात्री जोरदार आक्रमण केलं. दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त करून ऑपरेशन सिंदूर ही मोहीम फत्ते केली.

भारतीय हवाई दलानं मध्यरात्री दीडच्या सुमारास अतिरेक्यांच्या नऊ ठिकाणांवर यशस्वी स्ट्राईक करून पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला. भारतीय सेनेच्या या खास मोहिमेला ऑपरेशन सिंदूर असं नाव देण्यात आलं होतं. उल्लेखनीय बाब म्हणजे या मोहिमेत भारतीय सेनेनं पाकिस्तानी नागरिक किंवा पाकिस्तानी लष्कराच्या कोणत्याही ठिकाणांवर हल्ला केला नाही.

## पाकिस्तानकडून सीमेवर शस्त्रसंधीचे उल्लंघन; भारतीय सैन्याच्या गोळीबारात १० पाकिस्तानी जवान ठार

नवी दिल्ली : भारताने पाकिस्तानी दहशतवाद्यांना ठार करण्यासाठी राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानच्या पायाखालची वाळू सरकल्याचं दिसतंय. हडबडलेल्या पाकिस्तानच्या सैन्याने आता सीमेवर शस्त्रसंधीचं उल्लंघन केलं आणि भारतीय सैन्यावर गोळीबार केला. त्यामध्ये दहा भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला. भारताने दिलेल्या प्रत्युत्तरामध्ये १० पाकिस्तानी जवान ठार झाले आहेत.



पहलगाम हल्ल्याचा बदला घेऊन भारताने पाकिस्तानच्या नऊ दहशतवादी तळांवर हल्ला केला. त्यानंतर सीमेवर परिस्थिती चिघळू नये अशी इच्छा आहे. परंतु पाकिस्तानने तणाव वाढवला तर त्याला निर्णायक उत्तर देणार असल्याचं भारताने आधीच स्पष्ट केलंय. आताही सीमेवर पाकिस्ताने केलेल्या गोळीबाराला उत्तर देताना भारताने पाकिस्तानच्या १० जवानांना ठार केलं आहे.

भारताने पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला असून पाकिस्तानात १०० किमी आत घुसून दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. भारताने पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातल्या दहशतवाद्यांच्या नऊ तळांवर मध्यरात्री जोरदार आक्रमण केलं. दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त करून ऑपरेशन सिंदूर ही मोहीम फत्ते केली.

## भारताच्या आतंकवाद्याविरुद्धच्या कारवाईबद्दल शिवसेनेकडून जल्लोष




**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** पाकिस्तान मधील नऊ दहशतवादी तळ उध्वस्त करून भारतीय लष्कराकडून महत्त्वाची कामगिरी केल्याबद्दल मेहकर येथे शिवसेनेच्या वतीने फटाके फोडून जल्लोष व्यक्त करण्यात आला.

आज दुपारी शिवसेना कार्यालयासमोर माजी आमदार संजयजी रायमुलकर,युवा सेना जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव,उपजिल्हाप्रमुख राजेंद्र गाडेकर, तालुकाप्रमुख सुरेश वाळूकर, शहरप्रमुख जयचंद बाठीया,योगेश जाधव, कैलास सुखदाने , बबनराव तुपे, युवा सेनेचे भूषण घोडे, सरपंच संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अरुण दळवी, मनोज सावजी, संतोष चनखोरे , गजानन देशमुख , समाधान साबळे, संजय चव्हाण, बबलू मुंदडा, माजी नगरसेवक मनोज जाधव, पिंटू सुरजन, ओम सौभागे, संतोष पवार, रामेश्वर भिसे , नंदू बंगाळे, गणेश भालेराव, हर्षल गायकवाड, साबिर गवळी ,शुभम घोडे, रमेश गायकवाड ,शरद घोडे, विलास आखाडे,पिंटू भुजवटराव यांच्या उपस्थितीत हिंदुस्थान जिंदाबाद च्या घोषणा देऊन फटाक्यांच्या आतिषबाजीत जल्लोष करण्यात आला.

पान १ वरून...

## पंतप्रधान मोदी स्वत: मॉनिटर करत होते..

मिळवून देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू करण्यात आले होते. या कारवाईत ९ दहशतवाद्यांचे अड्डे लक्ष्य करून नष्ट करण्यात आले. ऑपरेशन सिंदूर दरम्यान, निष्पाप नागरिकांना इजा होणार नाही याची काळजी घेण्यात आली. मार्च २०२५ मध्ये जम्मू आणि काश्मीरमधील चार जवानांची हत्या करण्यात आली होती. मुंबई दहशतवादी हल्लयात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांच्या लपण्याच्या आणि प्रशिक्षणाच्या ठिकाणांनाही लक्ष्य करण्यात आले आहे. मरकज सुभानल्लाह हे जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय होते. येथे दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जात असे. कोणत्याही लष्करी ठिकाणाला लक्ष्य करण्यात आले नाही आणि नागरिकांची जीवितहानी झाली नाही, अशी माहिती लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली आहे. यावेळी त्यांनी टार्गेट असलेली आणि ती ठिकाणे उद्धुस्त झाल्याचे फोटो देखील दाखवले.

भारताने केलेल्या संपूर्ण कारवाईची माहिती कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग या दोन महिला अधिकाऱ्यांनी दिली. सोफिया कुरेशी माहिती देताना म्हणाल्या, आम्ही पीओके आणि पाकिस्तानमधील एकूण ९ दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला केला आहे. या हल्लयांदरम्यान, आम्ही खात्री केली की फक्त दहशतवादी मारले जातील आणि कोणत्याही नागरिकाचे नुकसान होणार नाही. आम्ही कोटली अब्बासमधील दहशतवादी तळ उद्धुस्त केलं. या छावणीत सुमारे १५०० दहशतवाद्यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. याशिवाय, पाकिस्तानी पंजाबमधील बहावलपूर आणि महमूना झोया येथेही दहशतवाद्यांचे अड्डे उद्धुस्त करण्यात आले आहेत.

अजमल कसाबला प्रशिक्षण मिळालेले दहशतवादी अड्डेही उद्धुस्त

एवढेच नाही तर मुरीदके येथील मरकज तैयबा देखील उद्धुस्त करण्यात आला आहे. हे लष्कराचे मुख्यालय असल्याचे म्हटले जाते आणि दहशतवादी अजमल कसाबलाही येथून प्रशिक्षण मिळाले होते. सोफिया कुरेशी म्हणाल्या की, आम्ही पाकिस्तानच्या कोणत्याही लष्करी तळाचे नुकसान केलेले नाही. याशिवाय नागरिकांचे कोणतेही नुकसान झालेले नाही. आम्ही लक्ष्यित हल्ला केला आणि हा हल्ला थेट दहशतवादी लपण्याच्या ठिकाणांवर होता.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# राज्यात १६ ठिकाणी मॉक ड्रिलचे प्रात्यक्षिक

## भारत पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीवर नागरिकांना सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र सरकारने युद्धजन्य परिस्थितीत देशाच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने मॉक ड्रिल करण्याचे सर्व राज्यांना निर्देश दिले होते. त्याच अनुषंगाने युद्धजन्य परिस्थिती उद्भवल्यास कमीत कमी वेळेत अधिकाधिक नागरिकांपर्यंत मार्गदर्शन आणि मदत पोहोचविण्यासाठी खबरदारी घेण्याच्या दृष्टीने दक्षता म्हणून आज ७ मे रोजी राज्यात १६ विविध ठिकाणी एकाच वेळी मॉक ड्रील घेण्यात आले. देशातील २५९ ठिकाणी युद्धाच्या अनुषंगाने ७ मे मॉक ड्रिल घेण्यात आले. यामध्ये संवेदनशीलतेच्या दृष्टीने कॅटेगरी १,२,३ अशी विभागणी करण्यात आली होती. कॅटेगिरी-१ मध्ये देशातील १३ शहरं होती. ज्यामध्ये ३ शहरे महाराष्ट्रातले आहेत. तर महाराष्ट्रात एकूण १६ ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीत जीवितहानी टाळण्याच्यादृष्टीने विविध प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.





### सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालय येथे पार पडले मॉक ड्रिल

सिंधुदुर्ग : भारत-पाकमधील युद्धाची शक्यता वर्तविण्यात येत असल्याने केंद्रीय गृह मंत्रालयाने मॉक ड्रिल करण्याचे आदेश दिले. यानुसार, संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यात संध्याकाळी ४ ते ४.१५ पर्यंत या वेळेत मॉक ड्रिल करण्यात आले. सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालय येथे हे मॉक ड्रिल पार पडले. यामध्ये ओरोस येथील आयटीआय कॉलेज, एनसीसी विद्यार्थी, स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी यांनी युद्धजन्य परिस्थितीतील सराव प्रात्यक्षिके केली. तर रात्री ८ ते ८.१५ या वेळेत देवगड, वेंगुर्ला आणि मालवण या सागरी भागात वीज बंद करण्यात येणार आहे.

### छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकाबाहेर मॉक ड्रिल

मुंबई : पाकिस्तानवर एअर स्ट्राइक केल्यानंतर प्रशासन अलर्ट मोडवर आले असून भारत-पाकमधील युद्धाची शक्यता वर्तविण्यात येत असल्याने केंद्रीय गृह मंत्रालयाने मॉक ड्रिल करण्याचे आदेश दिले होते.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकाबाहेर मॉक ड्रिलचं आयोजन करण्यात आले होते.मॉक ड्रिलमध्ये नागरिकांनी काय काळजी घ्यावी याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.अशी माहिती मुख्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील नीला यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### पाकिस्तानवर एअर स्ट्राइक केल्यानंतर प्रशासन अलर्ट मोडवर

रत्नागिरी : पाकिस्तानवर एअर स्ट्राइक केल्यानंतर प्रशासन अलर्ट मोडवर आहे. जिल्ह्यात पाच ठिकाणी मॉक ड्रिल घेण्यात आले आहे. सायरन वाजवून युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास प्रशासनाची रंगीत तालीम घेण्यात आली आहे. नागरी संरक्षण दलाचे जिल्हा उपनियंत्रक लेफ्टनंट कर्नल प्रशांत चतुर यांच्या मार्गदर्शनाखाली मॉक ड्रिल घेण्यात आले आहे. जिल्ह्यातील रत्नागिरी तहसिलदार कार्यालय, रत्नागिरी रेल्वेस्थानक, राजापूर नगरपालिका, दापोली आणि संगमेश्वर तालुक्यातील एक ग्रामपंचायत ऑपरेशन अभ्यास मॉक ड्रिल घेण्यात आले. यामध्येआरोग्य यंत्रणा, अग्निशमन दल, रुग्णवाहिका, प्रथोमोपचार या या गोष्टींची चाचणी घेण्यात आली. मत्स्यविभाग, बंदरे, मेरीटाईम बोर्ड, फिनोलेक्स, जेएसडब्ल्यू, अल्ट्राटेक आदी कंपन्या, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत औद्योगिक वसाहतीमधील महाविद्यालयांनी मॉक ड्रिल करुन त्याचा अहवाल प्रशासनाकडे सादर करण्यात आला आहे . अशी माहिती जिल्हाधिकारी एम. देवेंद्र सिंह व पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### छत्रपती संभाजीनगर येथील रेल्वे स्थानकावर मॉक ड्रिल

छत्रपती संभाजीनगर : पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव वाढला आहे. पाकिस्तान पोसत असलेल्या दहशतवाद्यांचा अड्डा भारताने उखाडून टाकला. यानंतर पाकिस्तानने पोकळ धमकी द्यायला सुरुवात केली आहे. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान कारवाई करण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे लक्षात घेता रेल्वे स्थानकावर हल्ला झाल्यास काय उपाययोजना कराव्या, यासाठी रेल्वे विभागाकडून संरक्षणाचे धडे दिले जात आहेत. आज ७ में रोजी छत्रपती संभाजीनगर येथील रेल्वे स्थानकावर मॉक ड्रिल पार पडले. हल्ला झाल्यावर एकमेकांना कसे वाचवावे, एकमेकांच्या मदतीने सर्वांचे संरक्षण कसे करावे, असे प्रशिक्षण यावेळी देण्यात आले.

### उरणच्या एन. आय. शाळेमध्ये मॉक ड्रिल

नवी मुंबई : मधील उरण शहर हे संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून, आज उरण मधील एन. आय. हायस्कूल मध्ये मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास सगळ्या शासकीय यंत्रणा कशा पद्धतीने काम करतात.त्यांचा रिस्पॉन्स टाईम किती? याचा आढावा घेण्यात आला. या मॉकड्रिलमध्ये पोलीस, सिव्हिल डिफ `न्स, रायगड डीआरएफ, नागरी संरक्षण दल, अग्नीशमन दल आणि वैद्यकीय सेवा सहभागी झाले होते. अशी माहिती रायगडचे आपत्ती व्यवस्थापक सागर पाठक व पनवेल उपविभागीय अधिकारी पवन चांडव यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### पुणे जिल्ह्यात सहा ठिकाणी 'मॉक ड्रिल'

पुणे : केंद्र सरकारच्या निर्देशाप्रमाणे युद्धजन्य परिस्थितीत काळजी घेण्याच्यादृष्टीने विधानभवन, मुळशी पंचायत समिती, तळेगाव नगरपरिषद, वनाज औद्योगिक वसाहत, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका या ठिकाणी आज दुपारी ४ वाजता 'मॉक ड्रिल' घेण्यात आले. मॉक ड्रिलची गांर्भियता लक्षात घेता, सर्व संबंधीत यंत्रणांनी अतिशय शिस्तबद्ध पध्दतीने काम केले. या ठिकाणी आपण पुणे विधान भवन या ठिकाणची काही प्रात्यक्षिके पाहिली. युद्धजन्य परिस्थिती उद्भवल्यास कमीत कमी वेळेत अधिकाधिक नागरिकांपर्यंत मार्गदर्शन आणि मदत पोहोचविण्यासाठी खबरदारी घेण्याच्यादृष्टीने दक्षता म्हणून, मॉक ड्रील घेण्यात आले. यावेळी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास जीवितहानी टाळण्याच्या दृष्टीने विविध प्रात्यक्षिके केली गेली. केंद्रीय संरक्षण दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ), जिल्हा प्रशासन, पोलीस, महानगरपालिका, नगरपालिका, आरोग्य, अग्निशमन दल, महाविद्यालयीन विद्यार्थी, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना आणि नेहरु युवा केंद्राचे समन्वयक यांचा या मॉक ड्रीलमध्ये सहभागी होता. अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.



### खामगावात प्रशासनानाची मॉक ड्रिल

बुलढाणा : भारत पाकिस्तान युद्धजन्य परिस्थिती च्या पार्श्वभूमीवर खामगाव येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदान येथे शिवाजी नगर, शहर व ग्रामीण पोलिसांच्या वतीने मॉक ड्रिल घेण्यात आले. शहरात तणावाची परिस्थिती निर्माण झाल्यास प्रशासनाने काय काळजी घ्यावी, यासाठी ही मॉक ड्रिल घेण्यात आले. तणावजन्य परिस्थिती दाखवण्यात आली तसेच जखमी झालेल्या नागरिकांना रेस्क्यू टीमने रुग्णवाहिकेद्वारे रुग्णालयात कसे दाखल करावे,आग लागल्यानंतर आगीवर कसे नियंत्रण मिळवायला पाहिजे याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. त्यानंतर बुलढाणा येथील श्वान व बॉम्ब शोधक पथकाकडून घटनास्थळावर पाहणी करण्यात आली. व बॉम्बचा शोध लावण्यात आला.अशाप्रकारे प्रशासनाच्या वतीने मॉकड्रिल घेण्यात आले. सदर मॉकड्रिल एनसीसी बटालियनचे लेफ्टनंट कर्नल जोशी यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आले.अशी माहिती शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे ठाणेदार पितांबर जाधव यांनी दिली.





## पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांच्या मागे देश १०० टक्के उभा

### मंत्री गुलाबराव पाटील यांची माहिती

**सोलापूर/प्रतिनिधी** :भारताकडून ९ ठिकाणी एअरस्ट्राईक झालेले आहे, आणि जनतेला हे अपेक्षित होत. मागच्या काळामध्ये पाकिस्तानने एअरस्ट्राईक केलेलं होत, आणि यावेळेस तर २६ जीव गेल्यामुळे त्यांना धडा शिकवलं पाहिजे होता. देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्र्याच्या मागे देश शंभर टक्के उभा आहे अशी माहिती स्वच्छता व पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांच मी अभिनंदन करतो. जी देशाला गरज आहे, ती ओळखून त्यांनी पाकिस्तानवर हल्ला केला आहे. तो स्वागतहार्य आहे, त्यामुळे देश त्यांच्यामागे १०० टक्के उभा आहे. तिथून माणसं पाठवून इथे दहशतवाद वाढावायचा, आणि सीमेवरील जी गाव आहेत, तिथं हल्ले सुरु ठेवायचे. ही पाकिस्तानची पहिल्यापासून वृत्ती राहिलेली आहे. त्यांना एकवेळेस उत्तर देण गरजेचे होत, आणि ते उत्तर आज आपण दिलेले आहे. हा केंद्र सरकारचा विषय असल्यामुळे मी त्यावर बोलणे उचित नाही. पीओके ताब्यात घेण्याबाबत त्यांच्या डोक्यात प्लॅन असेल, पण आपण त्याबाबत बोलणे उचित नाही. शेवटी देशाच्या यंत्रणेचा हा महत्वाचा विषय आहे, त्याच्यावर जास्त वच्छता करणे उचित नाही. त्यामुळे आपल्या पंतप्रधानांचा स्वभाव जर ओळखला, तर काय पाहिजे ते बरोबर होणार आहे.असे मत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



### पाकिस्तानला धडा शिकवण्याची गरज होती

माजी खासदार इम्तियाज जलील : पत्रकार परिषदेत देशाच्या निर्णयाचे स्वागत



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** अपेक्षा होती २४ तासाच्या आत भारत हल्ला चढवेल, मात्र, आम्हालाही माहिती होत की, देशवासीयांना विश्वासात घ्यावे लागते. आज जो भारताने हल्ला केला आहे. त्याच आम्ही स्वागत करतो. पाकिस्तानला धडा शिकवण्याची गरज होती, ते भारताने केले. यामुळे भारतीय आनंदी आणि संतुष्ट आहे.असे मत माजी खासदार इम्तियाज जलील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले की, सर्व देशवासीयांची हीच भावना होती. उरी, पुलवामा, वैष्णोदेवी पहलगाम ह्या हल्ल्यामुळे देशवासियांमध्ये राग होता. दहशतवादी तळावर हल्ला करावा, मात्र सामान्य नागरिकांना त्रास होऊ नये याची काळजी घेतील. आपली संस्कृती वेगळी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात युद्ध होत होते, त्या काळी महाराज व मावळे कधीही मुल आणि महिलांवर हात टाकत न्हवते.डोनाल्ड ट्रम्प विश्वास ठेवण्यासारखे नाही. अमेरिकेत त्याचा विरोध चालला आहे. तो विचित्र माणूस आहे.हा हल्ला नाही, आत्मसरक्षणासाठी भारताने उचललेले पाऊल आहे. हा भारताचा अधिकार आहे.असे मत माजी खासदार इम्तियाज जलील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

## घेतलेला निर्णय योग्यच आहे : खा. सुप्रिया सुळे यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** आपण सगळे या काळात भारतीय आहोत. आपण देशा सोबत आहोत.आपल्या आर्मीचा आपल्याला सार्थ अभिमान आहे.भारतीय सैन्याला मानाचा मुजरा, हा निर्णय ज्या पद्धतीने घेतला आहे, तो योग्यच आहे.असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी त्या म्हणाल्या की, भारत सरकारने दिलेले ड्राफ्टींग अप्रतिम आहे.ते सगळ्यांनी त्याच कौतुक देखील केले आहे.भारताने सांगितल आहे की, हा सगळा कृर हल्ला होता. आणि आम्ही त्याचा विरोध केला आहे, आम्ही दहशतवाद्यांच्या विरोधात कारवाई केली आहे. कुठल्याही देशाला किंवा सैन्याला टार्गेट केले नाही. सगळ्या भारतीयांनी तुम्हाला सार्थ अभिमान वाटेल की, हा देश महात्मा गांधींच्या मार्गाने चालतो. मी स्वागत करते. ते कर्तृत्वान ज्यांच्या घरात ही दुर्दैवी गोष्ट झाली आहे. ज्यांना वीरमरण आलं त्यांच्या घरच्याच्या आयुष्यातील सुख आपण परत आणू शकत नाही. ही लढाई दहशतवादा विरोधात आहे, हे भारताने सांगितल आहे. नाव काय दिले, हे त्या त्या सरकारच्या मनावर असते.भारतीय सैन्य जे करत त्याच नेहमी मनापासून मी स्वागत करते. ते कर्तृत्वान आहेत. आम्हाला त्यांचा सार्थ अभिमान आहे.इंडियन आर्मिला ला मनाचा मुजरा.युद्ध आपण लढलो आहोत.आपला इतिहास युद्धाचा आहे.भारत हा एक आहे राजकीय विषय नाही, आम्ही भारता सोबत आहोत. हे आम्ही सर्वपक्षीय बैठकीत सांगितलं होते. ही सगळी चर्चा झाली होती. आम्ही सगळे भारतीय आहोत, देशाच्या ऐक्यासाठी पूर्ण ताकतीने सरकारसोबत आहोत.असे सांगतील होते.मंत्री राजनाथ सिंह यांचं देखील कौतुक.ही टीका टिप्पणी सूचना करायची वेळ नाही, आम्ही सगळ बैठकीत सांगितले होते, हे सगळ नाजुकपणे हाताळल पाहिजे, या काळात आमच्यासारख्या लोकप्रतिनिधींनी शांत रहावं आणि कौतुक करावे. ही वेळ दहशतवाद्याला हरवायची आहे. हे जग दहशतवादाच्या विरोधात आहे. मॉक ड्रिल होतील पण ब्लॅक आऊट ४ वाजता कसा होईल मला माहिती नाही.भारत सरकार प्रधानमंत्री आणि त्यांची सगळी टीम यांना सहकार्य करण्याची भूमिका हे सगळ्या नागरिकांचे कर्तव्य आहे. असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.



# कृषी सहाय्यकांच्या समस्यांचा शासन स्तरावर पाठपुरावा करणार-शिवसेना आ. सिध्दार्थ खरात

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी :** कृषी विभागाच्या होऊ घातलेल्या आकृतीबंधमध्ये कृषी सहाय्यक यांच्या पदोन्नतीचा गुंता दूर करण्यात यावा, या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेने मेहकर तालुका कृषी अधिकारी कार्यालया समोर तीव्र आंदोलन सुरु केले आहे या आंदोलनाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी आज बुधवार दि.७ मे २०२५ रोजी भेट देऊन कृषी सहाय्यकांच्या समस्या जाणून घेतल्या असून सर्व मागण्या पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली.या वेळी शिवसेना तालुका प्रमुख निंबाजी पांडव, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष दत्ता घनवट, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय वडतकर, शहर प्रमुख किशोर गारोळे, ॲड संदीप गवई, गणेश सवडतकर आदी उपस्थित होते, सदर आंदोलन हे विविध टप्प्यात करण्यात येत आहे. दरम्यान आंदोलकांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना निवेदन देत मागण्या मान्य न झाल्यास १५ मे पासून कामबंद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सध्या कृषी विभागात आकृतीबंध तयार करण्यात येत आहे. यामध्ये कृषी सहाय्यक यांच्या पदोन्नतीबाबत अडचणी आहे. त्यामुळे संघटनेला विश्वासात घेऊन आकृतीबंध मंजूर करावा. आकृतीबंधमध्ये कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक यांचे प्रमाण ४:१ याप्रमाणे करण्यात यावे, कृषी सहाय्यक संवर्गाचे पदनाम बदलून सहाय्यक कृषी अधिकारी करण्यात यावे, कृषीसेवक कालावधी रद्द करून कृषी सेवकांना नियमित कृषी सहाय्यक पदाचे आदेश देण्यात यावे, कृषी विभागामध्ये वाढत्या ऑनलाइन कामाचा व्याप लक्षात घेता कृषी सहाय्यकांना लॅपटॉप उपलब्ध करून द्यावे, कृषी सहाय्यकांना कायमस्वरूपी मदतनीस मिळावी, पोखरासारख्या महत्त्वाकांक्षी योजनेमध्ये कृषी सहाय्यक यांच्या मदतीला समूह सहाय्यक नियुक्त करावे, कृषी निविष्ठा वाटपामध्ये सुसूत्रता आणावी आदी विविध मागण्याचे निवेदन आमदार सिद्धार्थ खरात यांना देण्यात आले आहे.सदर निवेदनावर विलास रिंढे,महेंद्र गजभिये यांच्यासह अनेकांच्या सुह्या आहेत.

## विविध वृत्त...

### माजी खासदार नवनीत राणा यांनी मानले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** ऑपरेशन सिंदूर राबविल्याबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांचे भाजपाच्या नेत्या व माजी खासदार नवनीत राणा यांनी मानले आभार मानले. यावेळी माध्यमांशी बोलताना माजी खासदार नवनीत राणा म्हणाल्या की, ज्या निर्दोष लोकांना पाकिस्तानी दहशतवाद्यांनी गोळ्या मारून ठार त्यांच्या पत्नींना मोदींकडून अपेक्षा होती. घर मे घुसकर मारा है कबर तुम्हारी खोदी है, इस देश के गद्दी पर हमारे मोदीजी बैठे है.. समजे क्या छोटे पाकिस्तान? बकरे की अम्मा कब तक खैर मनायेंगी?जबतक मनानी हो मनालो. देशातील महिला मोदींना प्रश्न विचारत होत्या की, केव्हा न्याय मिळेल? घर मे घुसके मारना किसे कहते है हे मोदींनी दाखवून दिले आहे. अभी तो ये शुरुवात है,पिक्चर अभी बाकी है. पाकिस्तान, याद रखना ये हिंदुस्तान है, जब तक जय श्रीराम और जय भीम का नारा रहेगा, तब तक देश कि तरफ कोई आख उठाकर नही देखेंगा. घर मे घुसकर मारा है, कब्र तुम्हारी खोदी है....देश के दिल्ली की गद्दी पर बाप बैठा तुमहारा मोदी हैं.......क्या बोलते छोटे पाकिस्तान?बकरे की अम्मा कबतक खैर मनाएगी?चुन चुन कर मारेंगे......भाजपा नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी पाकिस्तानला इशारा दिला आहे.

### उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा तालुका शिबिर दौरा कार्यक्रम जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** माहे एप्रिल ते जून २०२५ दरम्यान राबविण्यात येणारा उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या तालुका शिबिर दौरा कार्यक्रमात बदल करण्यात आला असून सुधारित शिबिर दौरा जाहिर करण्यात आला आहे. नागरिकांनी तालुका स्तरीय शिबीरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्वर हिरडे यांनी केले आहे.

शिबिर दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे : मे महिण्यात मेहकर येथे ८ व ३०, देऊळगाव राजा येथे १३ व २७, लोणार येथे १४ व २९, चिखली १६ व सिंदखेड राजा येथे २३ मे रोजी तर जुन महिण्यात मेहकर येथे ४ व १९, देऊळगाव राजा येथे १० व २६, लोणार येथे १२ व २७, चिखली येथे १६ व सिंदखेड राजा येथे २३ जून रोजी होणार आहे. शिबिराच्या ठिकाणी मोटार वाहन निरीक्षक व सहायक रोखपाल हजर राहणार आहेत.


### पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांसाठी ऑनलाईन अर्ज २ जूनपर्यंत आमंत्रित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हास्तरावर अनुदानावर विविध योजना राबविण्यात येतात. या योजनाचा लाभ घेण्यासाठी दि. २ जून २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन , असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. अमितकुमार दुबे व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. तृप्ती पाटील (खेडेकर) यांनी केले आहे.

राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दुधाळ गाई- म्हशींचे वाटप करणे, शेळी मेंढी गट वाटप करणे, १००० मांसल कुक्कुट पक्ष्यांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीस अर्थसहाय्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप या योजनांसाठी ऑनलाईन पद्धतीने लाभार्थी निवड प्रक्रिया चालू वर्षात राबविली जाणार आहे.

पशुसंवर्धन विभागामार्फत ३ मे पासून प्रक्रिया सुरू करण्यात आली असून २ जूनपर्यंत डेडलाइन देण्यात आली आहे. दि. २५ ते २७ जून या कालावधीत लाभार्थ्यांमार्फत कागदपत्रातील त्रुटींची पूर्तता केली जाईल. २ जुलै रोजी लाभार्थ्यांची अंतिम यादी तयार केली जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पशुपालकांनी अर्जासोबत स्वतःचा मोबाइल नंबर द्यावा. त्याच मोबाइल क्रमांकावर अर्जाच्या स्थितीबाबत संदेश पाठविण्यात येणार आहे. ऑनलाईन अर्ज :https://ah.mahabms.com या संकेतस्थळावर, त्याचप्रमाणे गुगल प्ले स्टोअरवरील AH-MAHABMS या ॲप्लिकेशनद्वारे भरता येईल. योजनेच्या अधिक माहितीसाठी लाभार्थ्यांनी तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, तालुका लघू पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय अथवा नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्रावर संपर्क साधावा.




## डाक विभागामार्फत ''ग्यान पोस्ट'' सेवा सुरु; नागरिक व विद्यार्थ्यांनी सुविधाचा लाभ घ्यावा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** डाक विभागामार्फत बदलत्या काळानुसार नवनवीन योजना, सेवा नागरिकांच्या सेवा देत आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र दिनाच्या निमित्त ''ज्ञान पोस्ट'' ही नवीन सेवा सुरु केली आहे. या सेवांतर्गत पुस्तक, शैक्षणिक साहित्य रास्त दरात पाठविता येणार असून या सेवाचा लाभ विद्यार्थी, नारिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अधीक्षक डाकघर बुलढाणा विभाग गणेश आंभोरे यांनी केले आहे. शाळा, पुस्तक प्रकाशक, सरकारी शैक्षणिक संस्था, खाजगी शैक्षणिक संस्था, लेखक, समिक्षक व इतर साहित्य पाठऊ शकणार आहे. यामध्ये कमीत कमी ३०० ग्राम व जास्तीत जास्त ५ किलो वजनाचे पुस्तक पाठविण्याची व्यवस्था आहे. सोबतच आपण बूक केलेले पुस्तकाचे वितरण होईपर्यंत ट्रॅक अँड ट्रेसची सुविधा देण्यात आली आहे. पुस्तक वाचकास भेटल्यानंतर पुस्तक पोहचल्याची पावती सुद्धा पाठवणाऱ्यास मिळणार आहे. त्यासाठी लागणारे दर ही रास्त आहेत. त्यामुळे सर्व शाळा, पुस्तक प्रकाशक, सरकारी शैक्षणिक संस्था, खाजगी शैक्षणिक संस्था, लेखक, समिक्षक व इतरांनी या सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पाकीस्तानसह पाकव्याप्त काश्मिरातील दहशतवादी तळ उध्वस्थ करुन ''ऑपरेशन सिंदुर'' यशस्वी केल्याबद्दल भारतीय सैन्य दलाचं अभिनंदन



दैनिक आपला विदर्भ

### देशवासीयांची एकजूट, राजकीय इच्छाशक्ती आणि सैन्य दलाने केलेल्या गगनभेदी कारवाईतुन ''ऑपरेशन सिंदुर'' यशस्वी झाल्याची केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची प्रतिक्रीया

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पहेलगाम येथिल पर्यटकांवर दहशतवादयांनी केलेल्या हल्ल्याचा बदला आज सकाळी भारतीय सैन्यांनी ''ऑपरेशन सिंदुर'' राबवत पाकीस्तानसह पाकव्याप्त काश्मिरमधील दहशतवादी तळांवर हल्ले करुन दहशतवादयांच कंबरडे मोडण्याच काम केल या ''ऑपरेशन सिंदुर'' मध्ये सहभागी झालेल्या सर्व सैन्यांच अभिनंदन करत देशवासीयांची एकजूट राजकीय इच्छाशक्तती, आणि सैन्याने केलेली गगनभेदी कारवाईतुनच ''ऑपरेशन सिंदुर'' यशस्वी झाल्याची प्रतिक्रीया केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली.

२२ एप्रिल रोजी जम्मू काश्मिरातील पहेलगाम येथिल भारतीय पर्यटकांना लक्ष करत दहशतवादयांनी त्यांचा धर्म विचारुन त्यांची हत्या केली या दहशतवादी हल्लचात २६ निष्पाप पर्यटकांचा बळी गेला. या हल्लचानंतर पर्यटक भयभीत झालेले असतांना त्यांना आधार देण्यासाठी शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथराव शिंदे साहेब स्वत: जम्मू काश्मिरला आले. आपणसुध्दा पर्यटकांच्या मदतीला धावुन गेलो त्यावेळी प्रत्येक भारतीयांची भावना या हल्ल्याचा बदला घेण्याची होती. त्याचवेळी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या हल्ल्यातील दहशतवादयांना चोख प्रत्युत्तर देवुन दहशतवादयांचे कंबरडे मोडण्याचे सुतोवाच केले होते त्यानुसार सैन्यांनी केलेल्या नियोजनांनंतर ७ मे च्या पहाटे पाकीस्तानसह पाकव्याप्त काश्मिरमधील ९ दहशतवादी तळ नष्ट करण्यात आले.




''ऑपरेशन सिंदुर'' मध्ये सहभागी झालेल्या सैनिकांच अभिनंदन करत भारतीय सैन्यांच्या क्षमतेवर देशवासीयांना पुर्ण विश्वास आहे. संपुर्ण देशवासीयांची एकजूट त्यांच्या पाठीमागे उभी आहे राजकीय इच्छाशक्ती आणि सैन्यदलाच्या गगनभेदी कारवाईतुनच ''ऑपरेशन सिंदुर'' यशस्वी झाले आहे. भारतीय वायुसेना, नौसेना आणि स्थलसेना नेतृत्वाचा सहभाग मोठा असुन ही कारवाई देशाच्या सीमेपलीकडे जाऊन दहशतवादयांचे कंबरडे मोडणारी आहे. अशा कारवायांसाठी राजकीय इच्छाशक्ती ही महत्वपुर्ण आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाने ''ऑपरेशन'' सिंदुरच्या माध्यमातुन हे दाखवुन दिले आहे. दहशतवाद बिमोड करण्यासाठी अशा कारवाया सुरुच राहतील असा विश्वासही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी या वेळी व्यक्त केला.

## उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण, व्यक्तीमत्व विकास शिबीर १५ मेपासून

### खेळाडू व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणेयांचे मार्फत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलडाणा, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र बुलडाणा तसेच जिल्ह्यातील विविध एकविध खेळांच्या संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे दि.१५ ते २४ मे २०२५ या कालावधीत शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरामध्ये विविध क्रिडा व आरोग्य विषयक तज्ज्ञांव्दारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या शिबिराचा खेळाडू, विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी केले आहे.

शिबिरांचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरुन रोड, बुलडाणा व जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल, बुलडाणा येथे सकाळी ६ ते ८.३० व सायंकाळी ५ ते ७ या दोन सत्रामध्ये हॅण्डबॉल, फुटबॉल, खो-खो, मैदानी व बॉक्सिंग, इ. खेळाचे तसेच व्यक्तीमत्व विकास शिबीराअंतर्गत वक्तृत्वस्पर्धा, चित्रकला, सुंदर हस्ताक्षर, योगा, एरोबिक्स, लाठीकाठी, कराटे, दंतचिकीत्सा, खेळ दुखापत व प्रथमोपचार, आहार विषयक माहिती देण्यात येणार आहे.

शिबीराला उज्वला लांडगे रा.क्री.मा. (हॅण्डबॉल), जीवन मोहाड रा.क्री.मा. (फुटबॉल) व विविध एकविध खेळ संघटनेचे तज्ज्ञ मार्गदर्शक करतील. शिबीरामध्ये शहरातील वयोगट १२ ते १७ वर्ष मुले-मुली यांना सहभागी होऊ शकतात. नियमित उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंना कार्यालयामार्फत प्रमाणपत्र देण्यात येईल. अधिक माहितीकरीता उज्वला लांडगे रा.क्री.मा. (हॅण्डबॉल) ९७६४७३२७६८, श्री.जीवन मोहाड रा.क्री.मा. (फुटबॉल) ९४०५७३४४०३ यांचेशी संपर्क साधावा.

## कृषी सहाय्यकांचे विविध मागण्यांच्या संदर्भात एक दिवशीय धरणे आंदोलन

दैनिक आपला विदर्भ



रिसोड - तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी आंदोलन स्थळी भेट दिल्यानंतर कृषी सहायकांच्या वतीने त्यांना निवेदन देण्यात आले

**रिसोड/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटना शाखा रिसोड च्या वतीने विविध मागण्या च्या पूर्ततेसाठी एक दिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले आहे सदर मागण्या मंजूर न झाल्यास टप्प्याटप्प्याने आंदोलन करून १५ मे पासून सर्व योजनांच्या कामकाजावर बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेच्या वतीने देण्यात आली आहे

कृषी सेवक कालावधी रद्द करून कृषी सेवकांना पदावर कायम करणे, कृषी सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषी अधिकारी करणे, कृषी विभागातील संपूर्ण कामकाज डिजिटल स्वरूपात होत असताना कृषी सहायकांना लॅपटॉप दिला जात नाही, कृषी सहायकांना ग्रामस्तरावर कामकाज करण्यासाठी मदतनीस देण्यात यावा ,निविष्ठा वाटपा संदर्भात वारंवार निवेदन देऊन सुद्धा त्यामध्ये सुसूत्रता येत नसून कृषी सहाय्यकांना वाहतूक भाड्या पोटी आर्थिक भार सहन करावा लागत आहे त्यांना वाहतूक भाड्याची तरतूद करण्यात यावी ,कृषी विभागाच्या आकृतीबंधास तात्काळ मंजुरी द्यावी व त्यामध्ये कृषी पर्यवेक्षक यांची पदे वाढवून कृषी सहायकांच्या पदोन्नती मधील कुंटीतावस्था दूर करावी ,महसूल विभागाप्रमाणे आकृतीबंध करावा ,पोखरा योजनेमध्ये समूह सहाय्यकांची पदे पूर्वीप्रमाणे भरण्यात यावी , योजनेअंतर्गत लक्षांक देताना क्षेत्रीय स्तरावरील अडचणीचा विचार करून लक्षांक देण्यात यावा ,नैसर्गिक आपत्तीचे पंचनामे करणे व तदनंतर करावयाच्या कामाबाबत महसूल ग्रामविकास व कृषी विभागाच्या जबाबदाऱ्याबाबत योग्य न्याय संगत कार्यपद्धती तयार करण्यात यावी , सिल्लोड येथे कृषी सहाय्यकाची आत्महत्या संदर्भात चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी ,कृषी सहाय्यक संवर्ग आस्थापना विषयक अडचणीची सोडवणूक करण्यात यावी . कृषिमंत्र्यांनी सदर मागण्याबाबत दहा फेब्रुवारी रोजी बैठक बोलावून पंधरा दिवसात सोडवणूक करण्याची आश्वासन दिले होते परंतु आजपर्यंत काहीही तोडगा निघालेला नाही सदर मागण्यांची सोडवणूक न झाल्यास टप्प्याटप्प्याने आंदोलन करून १५ मे पासून सर्व योजनांच्या कामकाजावर बेमुदत काम बंद आंदोलन पुकारण्यात येणार आहे कृषी सहाय्यक हा गाव पातळीवर महत्त्वाचा घटक असल्यामुळे तसेच ऐन खरिपाच्या तोंडावर आंदोलन होत असल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणी निर्माण होणार आहेत.